
## प्रकरण पहिले

# जीवन चरित्र व व्यक्तिमत्त्व



SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

# प्रकरण पहिले

## कवी कुंजविहारी : जीवनचरित्र व व्यक्तिमत्त्व

१) विषयाचे महत्त्व आणि अभ्यासपद्धती

२) प्रकरणाची भूमिका

३) कवी कुंजविहारी : जन्म व शिक्षण

४) गिरणी कामगार.....दुकानदार-विमा एजंट

५) कौटुंबिक जीवन

६) राष्ट्रीय चळवळीतील सहभाग

७) कारावास

८) सामाजिक कार्य

९) वाङ्.मयीन संस्कार व काव्यलेखनाची प्रेरणा

१०) वाङ्.मयीन कार्य

११) व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये -

    १) ध्येयवाद

    २) राष्ट्रभक्ती

    ३) साधेपणा

    ४) संकटाशी झुंज

    ५) अध्यात्माचे प्रेम

    ६) आशावाद

१२) साहित्य निर्मिती

१३) समारोप

संदर्भ सूची

## प्रकरण १ ले

# विषयाचे महत्त्व आणि अभ्यासपद्धती

### अ) विषयाचे महत्त्व पुढीलप्रमाणे -

भारतीय स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव १९९७ ला पूर्ण झाला. या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात ज्या-ज्या देशभक्तांनी व साहित्यिकांनी भाग घेतला त्याचे स्मरण करण्यात आले. साहित्यिकांनी स्वातंत्र्य चळवळीला पोषक अशा राष्ट्रीय भावनेचा पुरस्कार आपल्या साहित्यातून केला. त्यात महत्त्वाचे सोलापूरचे साहित्यिक कवी कुंजविहारी हे होत. कवी कुंजविहारी यांनी कविता लिहिल्या. या कविता त्यांनी केवळ कवितेसाठी म्हणून निर्माण केलेली नसून त्या त्यांच्याआत्मानुभूतीतून स्फुरलेल्या आहेत. (कवी कुंजविहारी यांच्या विचारावर, कृतीवर व साहित्यावर लो.टिळक, महात्मा गांधी अशा थोर विभूतींचा पगडा होता.) कवी कुंजविहारी यांनी महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता व कारावासही भोगला. 'माझे ध्येय', 'मुळशीचा पाळणा', 'भेटेन नऊ महिन्यांनी', 'टाक पुढे पाऊल', 'स्वराज्य नारायण', 'उद्याचा देव असावा कसा' या त्यांच्या कविता महाराष्ट्रात खूप गाजल्या. भेटेन नऊ महिन्यांनी ही तर त्यांची सर्वोत्कृष्ट कविता भारतभर गाजली.

अशा विपूल आणि चांगल्या प्रकारची काव्यरचना करणाऱ्या देशभक्त कवी कुंजविहारी यांच्या कवितांचा चिकित्सक अभ्यास करावा असे माझ्या मनात आले. त्यासंबंधी माहिती मिळविताना माझ्या असे लक्षात आले की, शिवाजी विद्यापीठाने त्यांचा 'आहुती' हा काव्यसंग्रह प्रकाशित केला आहे. शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ.अप्पासाहेब पवार यांनी कवीचा अल्पसा का होईना सन्मान करण्यासाठी तो काव्यसंग्रह प्रकाशित केला आहे. श्री.ज.शा.देशपांडे यांनी त्यांच्या कविता संग्रहित

करून आस्वादक प्रस्तावना लिहिली. तसेच १९९७ हे वर्ष कुंजविहारीच्या जन्मशताब्दीचे वर्ष, त्यानिमित्ताने त्यांच्या अप्रकाशित, प्रकाशित अशा सर्व कवितांचा 'समग्र कुंजविहारी' असे संकलन केले आहे. डॉ. निलकंठ पुंडे यांनी हा काव्यसंग्रह सोलापूर महानगरपालिकेने प्रकाशित केला आहे. 'गीतगुंजारव', 'आहुती', 'समग्र कुंजबिहारी' या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावना आस्वादक आहेत. परंतु कुंजविहारींच्या काव्याचा संशोधनात्मक व समीक्षात्मक अभ्यास झाला नाही. तसेच आधुनिक मराठी काव्यात, राष्ट्रीय काव्यात कुंजविहारीचे स्थान हे वरचे आहे. म्हणून मी या विषयाची निवड केली.

**ब) चरित्रात्मक अभ्यास पद्धती -**

कवी कुंजविहारी यांच्या कविता आत्मानुभूतीतून आल्या आहेत. म्हणून त्यांच्या कवितांचा अभ्यास चरित्रात्मक अभ्यास पध्दतीने करण्याचे योजिले. या पध्दती विषयीचे विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

चरित्रात्मक अभ्यास पध्दतीमध्ये कुंजविहारींच्या कवितांचा अभ्यास केला जाणार आहे. कवीला संपूर्णपणे काळाचे अपत्य मानणे बरोबर नसल्याने कवीच्या चरित्राला काव्यात महत्त्व प्राप्त होते. कलाकृतीच्या अभ्यासाच्या दृष्टीने कवीच्या घडलेल्या जीवनालाच अधिक महत्त्व येते. कवी ज्याच्या संगतीत वाढला त्याची जीवन विषयक दृष्टी ज्यांच्यामुळे निश्चित झाली, त्या दृष्टी, त्या कलाकृती लिहल्या. स्वत:चे जे विचार बनविले त्याचे प्रतिबिंब त्यांच्या कलाकृतीतून उमटणे अपरिहार्य असते. माणसाचे जीवन हाच संग्राम आहे. त्यात त्याला कधी अपयश येते तर कधी मोठे यशही मिळते. त्यासाठी त्याने आपल्या व्यक्तिमत्त्वाची उंची वाढविलेली असते. त्याने मानवी जीवनाचे ज्ञान करून घेतलेले असते. त्यामुळे त्याची जीवनाकडे पाहण्याची एक स्वत:ची अशी

दृष्टी बनलेली असते त्याचे हे जे व्यक्तिमत्त्व बनलेले असते. त्याचे ताणेबाणे त्याच्या साहित्यात अपरिहार्यपणेच उमटलेले असतात. त्यामुळे वाङ्.मयाच्या अभ्यासात साहित्यिकांच्या चरित्राला एक वेगळेच महत्त्व प्राप्त होते.

समीक्षक केवळ जिज्ञासा तृप्तीसाठीच कलाकृतीकडे वळतो असे नव्हे तर तो कलाकाराचे जीवनचरित्र आणि त्याची कलाकृती यांच्यामध्ये संबंधचा अभ्यास करीत असतो. एखाद्या जमिनीत कोणते पीक चांगले येईल हे सांगण्यासाठी जमिनीची माहिती असली पाहिजे. हे जसे तसेच एखाद्या कलाकृतीचा अभ्यास ती कलाकृती ज्या लेखकाच्या जीवनचरित्ररूपी जमिनीत रूजली तिचे ज्ञान असणे आवश्यक असते. उदाहरणार्थ साने गुरूजींच्या साहित्यातील कारूण्य, भारतीय जीवन मूल्यावरील त्याची अढळ निष्ठा त्यांच्या जीवनाचा स्थायी भाव होता. त्यामुळे त्यांच्या 'शाम' च्या जीवनातील कारूण्याचे मर्म अधिक स्पष्ट होते. गडकऱ्यांच्या वाङ्.मयातील विनोद कोटीप्रधानता व बुध्दिप्रधानता का? या प्रश्नाचे उत्तर गडकऱ्यांच्या जीवनाकडे पाहण्याच्या बुध्दिप्रधान दृष्टिकोणात सामावलेली आहे. शंकरराव खरातांच्या कथावाङ्.मयात वर्ण वर्चस्वाखाली दबलेल्या दीनदुबळ्याच्या जीवनाचे चित्र येते. त्यालाही कारण त्यांचे स्वतःचे जीवनचरित्र. सारांश कलावंताचे व्यक्तिगत चरित्र आणि कलाकृती यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे.

या चरित्रात्मक पध्दतीचा वापर करण्यासाठी समीक्षकाजवळ फार कौशल्य लागते. लेखकाच्या चरित्राची माहिती मिळविताना समीक्षकाने मिळवलेल्या प्रत्येक घटनेचा वाङ्.मयाशी संबंध लावून चालत नाही. त्यामुळे कलाकृतींचा विचार बाजूला पडून लेखकाच्या चरित्रालाच प्राधान्य दिले जाण्याची भीती संभवते. गडकऱ्यांच्या काव्यातील 'तारा' व 'तारका' या शब्दाच्या आधारे त्यांच्याविषयी जो निष्कर्ष काढण्यात आला आहे तो या प्रकारात मोडतो. त्यामुळे कलाकृतीच्या भावसौंदर्याऐवजी समीक्षेत

कलावंतांचे चरित्रच अधिक हाती लागण्याचा संभव नाकारता येणार नाही.

या चरित्रात्मक पध्दतीचा अर्थ असाही करता येईल की, साहित्यात प्रकट झालेल्या भाववृत्तीच्या आधारे लेखकाच्या भावजीवनाविषयी-चरित्राविषयी अनुमान करावयाचे. खांडेकरांच्या कादंबरीत जीवनचिंतन करणारी. त्यागाने जीवन सफल करणारी व्यक्तिचित्रेच अधिक येतात. त्याअर्थी खांडेकरांच्या जीवनात त्यागाचे महत्व आहे असे अनुमान करून खांडेकरांच्या चरित्रातील त्यागपूर्ण घटनांशी त्याचा संबंध पहावयाचा त्यामुळे त्याच्या कलाकृतीला आत्मनिष्ठेचे परिमाण लाभते.

**प्रमाणतत्त्वे -** ह्या पध्दतीची प्रमाणतत्त्वे अशी -

(१) प्रथम साहित्यातील भावानुभवाचे स्वरूप समजावून घेणे. (२) त्याची संगती लावण्यासाठी लेखकाच्या चरित्राची माहिती मिळविणे. (३) लेखक चरित्रातील घटनांशी संगती जुळविणे. (४) त्या संगतीद्वारा लेखकाला अभिप्रेत असलेल्या भावविश्वाचा अर्थ स्पष्ट करणे. उणिवा-चरित्राचा शोध वाजवीपेक्षा जास्त घेण्याचा मोह अटळ होता. त्यामुळे काही वेळा त्या समीक्षेपासून कलाकृती दूर फेकली जाते आणि समीक्षेला चरित्राचे स्वरूप येते. उदाहरणार्थ न.र. फाटकांची 'ज्ञानेश्वर', 'एकनाथ' यांच्यावरील समीक्षा हा या पध्दतीचा फार मोठा दोष आहे. त्याचप्रमाणे लेखकाचे चरित्र जेवढे उदात्त आणि भव्य असेल तेवढे त्याचे वाड्.मयही उदात्त आणि भव्य आहे. असे सांगितले जाते. तिसरी एक मर्यादा या पध्दतीला पडते आणि ती म्हणजे वाड्.मयात लेखकांच्या संपूर्ण चरित्राचे प्रतिबिंब पडलेले असते हे खरे नाही. किंबहुना ते बिलकूल नसते हेही तितकेच खरे आहे. उदाहरणार्थ, कवी विनायक यांच्या काव्यात त्यांच्या वैयक्तिक जीवनाचे बिलकुल प्रतिबिंब पडलेले नाही. त्यांच्या त्या लौकिक जीवनापेक्षा काव्यातील जीवन अत्यंत भव्योदात्त आहे. त्याचे जीवन तसे नव्हते.

चरित्रात्मक समिक्षा पद्धतीचे चित्र या मर्यादा लक्षात घेवूनही येथे कवी कुंजविहारी

यांच्या साहित्याचा चरित्रात्मक समिक्षा पद्धतीने अभ्यास केला आहे.

**२) प्रकरणाची भूमिका -**

कवी कुंजविहारींचा जन्म ऐन राष्ट्रीय चळवळीच्या काळात १० नोव्हेंबर १८९६ मध्ये झाला. मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये जन्मलेल्या कुंजविहारीचे पितृछत्र १२ व्या वर्षी हरपले. तेव्हापासून संसारिक जबाबदाऱ्या पार पाडत असता, काळाला सुसंगत राहून आपल्या काव्यवृत्तीने व कार्याने राष्ट्रीय कार्याच्या चळवळीमध्ये सहभाग नोंदवला आहे. कुंजविहारींच्या कवितांनी, कार्याने सोलापूरच्या इतिहासातच नाही तर महाराष्ट्राच्याही इतिहासात एक स्थान प्राप्त केले आहे.

इतिहासच भविष्यकाळाला प्रेरणा देत असतो. त्याच्यातले सत्वच भविष्याला दिशा देत असते. म्हणूनच भारताचे पारतंत्र्य संपले त्याच बरोबर या राष्ट्रीय कवितांचे महत्त्वही संपले का? असा प्रश्न काहींच्या मनात निर्माण होतो. याचं उत्तर नकारार्थी आहे. राष्ट्रीयत्त्वाची भावना देशाच्या प्रगती व विकासातही महत्त्वाची असते.

कुंजविहारीच्या कविता या राष्ट्रीयत्त्वाच्या असल्या, क्रांतीच्या, पारतंत्र्याच्या असल्या तरी त्या आत्मदर्शनाकडून अध्यात्माकडे म्हणजे पूर्ण मानवजातीच्या कल्याणाकडे झुकलेल्या आहेत. त्या काळातले मुलभूत प्रश्न आजही तसेच असल्याचे दिसून येतात. एकंदरीत त्यांच्या काव्यातून सामाजिक, राजकीय, व्यक्तिगत असे विविध विषय मांडले आहेत ते जसेच्या तसे आजही दिसून येतात. केवळ परिस्थिती आणि काळ बदलला आहे.

या टवटवीत कवितेतील सत्त्व आजही कायम आहे. नव्हे तर ते कधीच कोमेजू शकत नाही. ते कायम प्रेरणादायी ठरते. कुंजबिहारींच्या कवितेच्या अभ्यासाच्या निमित्ताने ते उलगडून दाखविण्याचा हा प्रयत्न आहे.

कोणतीही कलाकृती ही त्या कलाकाराची, निर्मात्याची प्रतिकृती असते का? तर याचे उत्तर कुंजविहारीच्या बाबतीत होकारार्थी आहे. जसे अनुभवले तसे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच त्यांच्या काव्याचा अभ्यास करत असता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचाही वेध घेणे योग्य ठरते. म्हणून कवी कुंजविहारींचा अल्पपरिचय पहिल्या प्रकरणातून घडविण्याचा हा प्रयत्न केला आहे.

**३) कुंजविहारींचा जन्म व शिक्षण -**

कुंजविहारींचा जन्म एका मध्यम परिस्थितीच्या कुटुंबात झाला. पितृछत्र हरपल्यानंतर त्यांना शिक्षणासाठी वेगवेगळ्या ठिकाणी रहावे लागले. परिस्थितीवर मात करत मॅट्रिकपर्यंत शिक्षण पूर्ण केले. कुंजविहारी यांचे नाव हरिहर गुरूनाथ सलगरकर-कुलकर्णी, जन्मदिनांक- १०-११-१८९६ रोजी तेव्हाच्या मोगलाईत मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील अंबलेगे, ता.देगलूर गावी झाला. त्यांचे वडील गुरूनाथराव हे पोलीस खात्यात नोकरीस होते. त्यांच्या आईचे नाव गीताबाई. वयाच्या १२ व्या वर्षी त्यांचे वडील निधन पावले. सर्व कुटुंबाला खुदवाडीवरून अक्कलकोट तालुक्यातील सलगर या आपल्या वडिलांच्या गावी येऊन रहावे लागले. तेथे थोडी शेती व कुलकर्णीपद होते. काही काळानंतर कवी शिक्षणासाठी अक्कलकोटला गेले. इ.स.१९१० मध्ये वयाच्या १४ व्या वर्षी एका लग्नाच्या निमित्ताने ते सोलापूरला आले. तेथेच राहिले. थोडे दिवस त्यांनी नगरपालिकेच्या तेव्हाच्या कमर्शिअल हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले. तत्कालीन 'सूर्योदय प्रेस' मध्ये ट्रेंडल चालविणे. तेथेच राहून, काही ठिकाणी वार लावून, त्यांनी दिवस काढले. याच काळात ते छापखान्यात छपाईचे काम शिकले. अशाप्रकारे मॅट्रिकपर्यंत शिक्षण येथे पार पडले. याच काळात इ.स.१९१२ मध्ये गिरणी कामगाराची नोकरी सुरू केली आणि इथेच शिक्षणाला पूर्णविराम मिळाला.

**४) गिरणी कामगार..... दुकानदार-विमा एजंट -**

शिक्षण थांबवून, घराचा भार वाहण्यासाठी त्यांना गिरणी कामगाराची नोकरी पत्करावी लागली. तसेच कवींचा चळवळीमध्ये सहभाग असल्याने परिस्थितीनुसार वेगवेगळे व्यवसायही करावे लागले. त्यामुळे जीवनात चढ - उतार निर्माण झाले. त्याचे वर्णनही त्यांच्याच काही कवितातून दिसून येते.

इ.स.१९१२ मध्ये कुंजविहारींना 'लक्ष्मी विष्णू' मिलमध्ये रू.१०/- पगारावर कापडावर क्रमांक घालण्याची नोकरी मिळाली व ते गिरणी कामगार झाले. त्यांचा पहिला लेख 'कल्पतरू' या साप्ताहिकात प्रसिध्द झाला. तो सुध्दा 'गिरण्यांना दवाखाने पाहिजेत' असा होता. काव्याच्या/ लेखनाच्या प्रेरणेची बिजे कुंजविहारींना या कामगार जीवनातच मिळाली. यानंतर लक्ष्मी विष्णू मिलमध्ये फोल्डिंग खात्यात चेकरची नोकरी कवींनी केली.

इ.स.१९१९ मध्ये सोलापूरला गिरणी कामगारांचा संप होऊन त्याचे पर्यवसान गोळीबारात झाले. त्याचा उल्लेख 'सोलापूर वर्णन' १ या कवितेत येतो. कवी गिरणी कामगाराविषयी म्हणतात-

"अजुनि टपटप थेंब टपकती मजूर बनूनी जा ऐका
सिमकाकाची कारकीर्द ही यमरायाचा जणु काका
भोळया जीवा विसरू कसा शेवटचा हा घ्या मुजरा
गिरणीमधला मजूर मीही भाऊबंद तुमचाच खरा" आ.पृ.२६

मजुरांच्या नशीबी अतीव कष्ट असतात. जणू त्यांचा जीवनक्रम यंत्राप्रमाणेच असतो. नव्हे तर तो कामगारच यंत्र बनतो. या जीवनाचे मूक मनोरथ कवींना उमगले आहे. नव्हे तर सर्व कामगाराच्या मनात संतापाच्या लाह्या उठल्या आहेत त्याचेच रूपांतर चळवळीत होते आहे. याचे चित्र 'रत्नागिरी परिषद' या कवितेत दिसते आहे.

"ही गुरूघंटा नोकरशाही करू पादाक्रांत

नोकरशाहिस हतबल बनवा सापडेल तेथे

सभांत घुसुनी जिथे तिथे ती निशिदिनी वावरते"      आ.पृ.२५

कवी सिध्देश्वराची सोलापूर नगरी आहे. या नगरीत यंत्रशक्ती आहे. ती यंत्रशक्ती वातावरणात धूर ओकते. तो धूर भूतदयामय धर्मध्वज उभारतो आहे असे वाटते. ही कल्पना कुंजविहारी 'सिदध सिंहासन' या कवितेत सांगतात, इ.स.१९२० मध्ये सोलापुरात तात्यासाहेब केळकरांच्या अध्यक्षतेखाली मुंबई इलाखा प्रांतिक परिषदेचे अधिवेशन भरले व या अधिवेशनास लोकमान्य टिळक हजर राहिले. त्यामुळे सोलापुरात नवीन चैतन्य निर्माण झाले त्या सुमारास स्वातंत्र्यशाहीर गोविंदाच्या कविता गाऊन दाखविणारे नाशिकचे गोखले बंधू सोलापुरास आले व त्यांनी 'अधरी धरि मुरली' इत्यादी गोविंदाच्या कविता लोकांना म्हणून दाखवल्या. त्यांनी कुंजविहारी या गिरणी कामगाराला स्फूर्ती दिली व गोविंदाच्या प्रतिभेने एक नवीन कवी महाराष्ट्राला दिला. ज्योतीने ज्योत पेटवावी तसा हा प्रकार झाला.

इ.स. १९२७ मध्ये युवक संघ स्थापन झाला त्याचे चिटणीस कुंजविहारी व श्री.पठाण होते. हळूहळू युवक संघटना व कामगार संघटना यांना जोर येऊ लागला. राजकीय चळवळ करणारे म्हणून कवींना ओळखण्यात येवू लागले. त्याचा परिणाम युवक संघाच्या चिटणीसा यांच्या नोकऱ्या गेल्या यावेळी कवींना रू.४०/- पगार मिळत होता.

नोकरी गेल्याने कवींना किराणा मालाची दुकाने काढून उदरनिर्वाह करावा लागला. मार्शल लॉ च्या कायद्यान्वये कवींना अटक झाली. एक वर्ष सक्त मजूरी व ५०० रू. दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. दंडादाखल त्यांची दुकाने मातीमोल किंमतीने विकली जाऊन त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन नष्ट झाले.

नोकरी गेल्यानंतर कवी पुन्हा तिच्या वाट्याला गेले नाहीत. ज्या नोकरदारांची

आपण चेष्टा केली ज्याची त्यांना चीड आली त्या दास्यवृत्तीची स्वीकृती त्यांच्याकडून झाली नाही. याचे कारण म्हणजे त्यांच्या काव्यदेवतेचा संदेश.

इ.स.१९२९ मध्ये त्यांनी काँग्रेसचे प्रभारी प्रचारक म्हणून ग्रामीण भागात कार्य केले. "नोकरी गेली दुकानें गेली तेव्हा त्यांनी हुंडेकऱ्याचा म्हणजे रेल्वे गोडाऊन मधून माल सोडवून मालाच्या टक्केवारीवरून मोबदला घेऊन मालकाच्या स्वाधीन करणे हा व्यवसाय केला. तसेच विम्याचाही व्यवसाय केला. केवळ कुंजविहारी आहेत म्हणून लोक विमा उतरवून घेत. परंतु कुंजविहारीच्या घरची परिस्थिती बिकट असूनही एखाद्या विमा एजंटला विमाधारक मिळाला नाही तर आपल्याकडील धारकांना तिकडे पाठवत." ३

"कवी अव्यवहारी असल्याने मोठमोठ्या लोकांच्या ओळखी झाल्या तरी त्यांचे दारिद्र्य कायम राहिले व संसाराची कायम फरफट झाली. सर्वांनी त्यांच्यावर गतकाळात स्तुतिसुमने उधळली पण या स्वातंत्र्य शाहीराला कुणी पुरेसा नजराणा दिला नाही. त्याची त्यांना अपेक्षाही नसे. आर्थिक परिस्थिती इतक्या हलाक्यांची होती की, त्यांच्या लाडक्या कवितेला पेपरवर उतरविण्यासाठी पैसा नसे म्हणून ते जाहिरातीच्या पेपरच्या पाठीमागच्या-पाठकोऱ्या-भागाचा उपयोग करीत असत"[४] केवढे मोठे मन ! केवढी निस्वार्थी भूमिका !! आणि त्यांच्या वाट्याला असे जिने !!!

अलौकिक प्रतिभा असलेल्या निस्वार्थ समाजसेवा करणाऱ्या कवी कुंजविहारीच्या वाट्याला असे दारिद्र्याचे जिणे आले होते.

### ५) कौटुंबिक जीवन -

कौटुंबिक जबाबदारी पार पाडण्याचे वय नसतानाही १२ व्या वर्षापासून त्यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी पडली ती शेवटपर्यंत पेलावी लागली. काव्य-कौटुंबिक जबाबदारी-

स्वातंत्र्य चळवळ या तिन्हीचा समन्वय घालता घालता कधी बेरीज तर कधी वजाबाकी, जास्त करून त्यांच्या कौटुंबिक जीवनामध्ये वजाबाकीच आली.

बालपण संपले आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या खांद्यावर आल्या. त्यांच्या वडिलांच्या मृत्यूने त्यांच्यावर एक भाऊ व तीन बहिणींना सांभाळण्याची जबाबदारी आली. सर्व कुटुंबीय खुदवाडी या गावी आले की, जे आजोळही होते. तेथून सलगर या त्यांच्या गावी आले. तिथून शिक्षणासाठी अक्कलकोटला व नंतर सोलापूरला आले. तिथेच स्थायिक झाले. सोलापूरच्या अहिल्याबाई उंबरीकर यांच्याशी लग्न झाले. शुक्रवार पेठ, करोडगीरी नाका, सोलापूर येथे राहिले. गिरणी कामगार-किराणा दुकान-हुंडेकरी विमाएजंट... आदी व्यवसाय केले. तरीही त्यांच्या नशीबी आर्थिक परिस्थिती बिकटच होती.

स्वतःकडे, कुटुंबाकडे कुंजविहारीचे दुर्लक्ष होते हे तेही जाणून होते. म्हणूनच तर 'मुळशीचा पाळणा' या कवितेत ते म्हणतात, -

"मनि संकट पडले भारी
बाळापरि मीही भिकारी
करि सवाल कुंजविहारी
हे धर्मात्मा पालनवाला कोई" आ.पृ.१५

तर कौटुंबिक जीवनाचे कोडे त्यांच्या 'बार्शीच्या भगवंतास' या कवितेमध्ये आले आहे.

"आयुष्याचे कोडे अवघड भिववित मज भारी
हारपला आनंद भावाला भ्याला कुंजविहारी।।"[५] आ.पृ.१७

पत्नीचे आजारपण, आर्थिक बिकट अवस्था अशा प्रतिकूल परिस्थितीमुळे कवींना कौटुंबिक पातळीवर अयशस्वीताच आली. असे प्रतिकुल जीवन असले तरी त्यांच्या

पत्नीकडून कधीही विरोध झाला नाही. जे असेल त्याचा स्वीकार केला. कुंजविहारी कारावासात असताना पत्नीने संसार सांभाळला. म्हणून कवी 'रत्नागिरी परिषद' या कवितेत म्हणतात-

'पत्नीच्या सौभाग्ये जागली जीवाची ज्योत'[६]

'सावित्री गीत' आ.पृ.२४ या कवितेमध्ये सुध्दा हीच जाणीव त्यांच्या काव्यपंक्तीत दिसून येतात.

"जन्मदारिद्र्याघरी आजवर तुला न सुख लाभले
मरणाविन या हृदयवेदना कधि शमतिल ना कळे"[७] आ.पृ.३६

'दाविरूप डोळा पांडुरंगा' मधील भावना अध्यात्माचे रूप देवून स्पष्ट केली आहे. ती म्हणजे त्यांच्या आई वडिलांचा मृत्यू -

"गीता गुरूनाथ मृत्यूभय भ्याला
दावी रूप डोळा पांडुरंगा" गीत पृ.१८

तसेच आई वडिलांची साधी इच्छाही पूर्ण करता येत नाही. 'भेटेने नऊ महिन्यांनी' या कवितेत कवी म्हणतात, -

मम बाळा गुणी वृदधपणी बहुसाल । आम्हाला सांभाळील
तव ममतेचे बोल ऐकले असेल । परिसारे उलटे झाले. आ.पृ.३०

कवीच्या कुटुंबाला आधार दिला त्यांच्या बंधूंनी नरहरी गुरूनाथ सलगरकर यांनी. नरहरींनी कुटुंबाच्या पालन पोषणाची जबाबदारी स्वीकारली तरीही कवीच्या मनात जी सुप्त वेदना होती तिचे चित्रण कवी "तयाला तुरूंग भिवविल किती?" या कवितेत कवी म्हणतात -

"त्रस्त जीवाच्या सुत्रभावना व्यक्त करूनि दाखवी
प्रतापी हा पुण्यात्मा कवी" आ.पृ.४६



SHIVAJI UNIVERSITY ... KOLHAPUR

कवीची ही वेदना उदात्ततेचे रूप घेवून प्रकट झाली तिचे वर्णन 'होळी' या कवितेमध्ये आले आहे.

कुंजविहारी - हृदय पोळते फुलत्या लाहीपरी ।

आज पौर्णिमा अग्निदिव्यव्रत आचरिते शांकरी ।। आ.पृ.७७

"कुंजविहारीच्या जीवनात अनेक अडी अडचणी आल्या परंतु त्यांनी कुणापुढेही पैशासाठी हात पसरला नाही"[५] कुंजविहारींच्या जीवनाच्या उत्तरार्धात त्यांच्या मुलींनीही कवींना कौटुंबिक स्वास्थ देण्याचा प्रयत्न केला त्यांना ५ मुली होत्या. सध्या ३ आहेत. त्या सांगतात - "बाबांनी कधीच घराचा विचार केला नाही फक्त देश, कविता आणि निस्वार्थ समाजसेवा"[६]

या निस्वार्थी जीवनाचे वर्णन 'भावसुमनांजली' या कवितेच्या ओळीत दिसून येते.

"दिव्य जीवनानंदात घेतली मी जेव्हा उडी

त्याच क्षणी प्रपंचाची सुटली ती सर्व कोडी" आ.पृ.११६

स्वतःचा संसाराचा त्यांनी विचार केला नाही कारण त्यांचा संसार स्वातंत्र्याचा, समाजाचाच नव्हे तर अखिल मानवजातीचा होता.

'वसुदेव कुटुंबकम' ही भावना त्यांची होती. अवघ्या मानवजातीचाच त्यांनी संसार मांडला होता. तो सुखी व्हावा एवढी त्यांची मनिषा होती.

**६) राष्ट्रीय चळवळीतील सहभाग -**

कुंजविहारी हे केवळ बोलके राष्ट्रभक्त व सत्याग्रही नव्हते तर प्रत्यक्ष चळवळीतील सहभागाने कर्ते असल्याचे दिसून येते.

"इ.स.१९१९ ला सोलापूरमध्ये गिरणी कामगारांचा संप झाला मालकांना फायदा

झाला होता. महागाई भत्ता मिळावा म्हणून कामगारांनी संप पुकारला. टिळकांनी संपाला मान्यता दिली. गोळीबारामुळे ७ कामगार ठार झाले. कुंजविहारीचाही या संपात सहभाग होता. त्यामुळे कामगारांच्यात हक्काची जाणीव निर्माण झाली. याचवेळी कुंजविहारींनी 'माझे ध्येय' ही कविता लिहिली. संदर्भ-[७]

इ.स.१९२२ च्या डिसेंबरात 'मुळशीचा पाळणा' लिहून कवींनी गांधीनी पुकारलेल्या सत्याग्रहाला प्रतिसाद दिला होता. तो पाळणा काँग्रेसमध्ये म्हणण्यात आला व तो पाळणा ऐकून चित्तरंजन दासांना गहिवर आला होता. कुंजविहारीचा धरणाला विरोध नव्हता तर त्यामधून निर्माण होणाऱ्या अन्यायाला विरोध होता.

"इ.स.१९२८ ला अकलूजच्या युवक परिषदेला कुंजविहारी हजर होते." संदर्भ-८

इ.स.१९२८ साली सरोजनी नायडू व प्रांतिक युवक संघाचे अध्यक्ष पंडित नेहरू यांना विजापूरहून सोलापूरला आणण्यासाठी कवी गेले व नेहरूंची चांगली ओळख झाली. याच वर्षी काकासाहेब गाडगीळांनी पुण्याला एक युवक परिषद बोलावली होती. त्यामध्येही त्यांनी सहभाग घेतला.

बिहारचे राष्ट्रीय कार्यकर्ते लक्ष्मीनारायण साहू सोलापूरला आले त्यांनी इंग्रजी कविता दिली त्याचे मराठी भाषांतर कवींनी केले. एकंदर चळवळीतील सहभाग व कार्य यामुळे कवींच्या ओळखी व कार्याला व्यापकता येण्याचा हा टप्पा आहे.

"इ.स.१९२० ते इ.स.१९३१ हा काळ विशेषतः राष्ट्रीय जनजागरणाच्या कविता लिहून कुंजविहारींनी गावोगाव गायल्या. जनतेत असंतोष पेटविला 'मुळशीचा पाळणा' आणि 'भेटेन नऊ महिन्यांनी' या कवितांनी देशभक्तीची ज्योत सर्वसामान्य माणसात पेटविली" संदर्भ-[९]

"तारीख १०-२-२९ रोजी श्री कुंजविहारी यांस काँगेसच्या कार्यासाठी पगारी

प्रचारक म्हणून नेमण्यात आले. त्यांनी सुमारे १५-२० खेड्यातून हिंडून जागृती केली. शहरातून सभासद नोंदविण्याचे काम केले. कॉंग्रेस कमिटीतर्फे पुणे येथे शिक्षण देण्याकरिता निघालेल्या वर्गात शिक्षण घेणे करिता त्यांना एक महिनाभर पाठविण्यात आले होते." संदर्भ-[१०]

इ.स.१९३०-३१ हा काळ म्हणजे महात्माजींच्या सत्याग्रह चळवळीचे अपूर्व व रोमांचकारी पर्व होते. त्यात सोलापूर शहराने इतिहास घडविला. ४-५-१९३० रोजी महात्माजींना अटक झाली म्हणून सोलापूरमध्ये पोलीस चौकी जाळली. ताबडतोब १२ मे रोजी सोलापूरात लष्करी कायदा पुकारण्यात आला. गोळीबार व धरपकड याचे सत्र चालू होते. एका गोळीने कवीचा जीव घेतला असता पण थोडक्यात चुकले. १६ मे ला कवी व कर्मयोगी रामभाऊ राजवाडे यांना छापखान्यात अटक झाली. कुंजविहारींना १ वर्ष सक्तमजुरी व ५००/- रू दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. त्यात उदरनिर्वाहाचे साधन जप्त झाले. सोलापूर प्रकरणाची प्रतिक्रिया म्हणजे हॉटसनवर गोळ्या झाडल्या.

इ.स.१९३२-३४ या काळात खुदवाडी येथे राहिले व तेथे शाळा काढली. तेव्हा तिथे काही मुले त्यांच्याकडे आली. पुन्हा त्यांनी पुण्यात जाऊन सत्याग्रह केला. काहींचे म्हणणे असे की, कवी त्यांना प्रशिक्षण देतात. परिणामी कवीचा दोष नसतानाही त्यांची शाळा बंद करण्यात आली. इ.स.१९३९ मध्ये राष्ट्रसभेचा व सरकारचा बेबनाव होऊन प्रांतिक मंत्रिमंडळाने राजिनामे दिले.

इ.स.१९४२ मध्ये देशात परत ब्रिटिशविरूध्द चळवळ सुरू झाली. तिचे पडसाद 'टाक पुढे पाऊल' या कवितेत उमटला आहे. ही कविता गांधीजींच्यावर आहे. हे उघड दिसते.

"विवेकवादी विश्वमित्र तू सुशील सत्याग्रही
तूझी एकली चाल 'मोहना' वंदिल सारी मही।'

काळोखाची भीति कुणा ज्या सूर्य न ठावा कधी

सूर्योदय होताच प्रगटतील किरण लक्षावधी" आ.पृ.५३

या कवितेतून स्वातंत्र्यसूर्याचे आगमन सुचित करतात. इ.स.१९४५ मध्ये कुंजविहारींना नवयुगाची चाहूल लागलेली दिसते ती 'नव्यायुगाच्या निर्मात्यांनो' कवितेतून.

"नव्या युगाच्या निर्मात्यांनो अनंत नमन तुम्हाप्रती"

असे कवींना वाटते त्यांच्या युगात निदान कल्पनेत तरी "स्वतंत्रता ती राव रंकना जित जेते ना भेद तिथे' शौर्य धैर्य ऐश्वर्ययुक्त जन सर्व सारखे सुखी तिथे।।" अशी आशावादी स्थिती अपेक्षित होती. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले व कवींच्या स्वप्नांचा एक भाग साकार झाला.

कुंजविहारींचे जीवन काव्यमय होते. म्हणजेच सहृदयतेने भरलेले होते. कवी सोलापुरातल्या सर्व पक्षीयांना प्रिय होते. सर्व साहित्यविषयक चळवळीचे एक केंद्र होते. सोलापुरातील अनेक नवे कवी कार्यकर्ते निर्माण करणारे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काही व्यक्ती आहेत. त्यात डॉ.किर्लोस्कर, कर्मयोगी राजवाडे आणि कुंजविहारी यांची नावे घ्यावी लागतील. कुंजविहारी म्हणजे नव्या कवीचे आशास्थान व नव्या कार्याचे स्फूर्तिस्थान बनले होते.

**७) कारावास -**

कुंजविहारीनी केवळ चळवळीतच भाग घेतला असे नाही तर यामुळे त्यांना कारावासही भोगावा लागला. तरीही ते डगमगले नाहीत. कारावासात असता आपल्या काव्याने, कार्याने स्वदेशी, परदेशी व्यक्तींवर एक वेगळीच छाप पाडली. तसेच तुरूंगात अभ्यासलेल्या संतवाङ्.मयाने त्यांच्या काव्याचा मूळ गाभा कायम राहिला. परंतु काव्य

मांडण्याची पद्धत, दृष्टिकोण बदलला. अशाप्रकारे अंतर्बाह्य परिवर्तन करणारे कारावासातील दिवस होते.

मार्शल लॉच्या अन्वये १ वर्ष सक्मजुरीची शिक्षा व ५००/- रू दंड झाला. शिक्षा म्हणून विजापूर, येरवडा व विसापूर अशी तीन तुरूंगात कवीची रवानगी झाली.

विजापूरला कवी आजारी पडले तरी त्यांना तेथे कैद्यांना पाला व खडे भरलेली भाकरी खावी लागते. हे गाऱ्हाणे वरपर्यंत पोहचवले. त्यामुळे ज्येव्हा सोलापूरचे बंदी येरवड्यात जाऊ लागले तेव्हा बाकीच्यांच्या डोळयात पाणी आले. विजापूरचा तुरूंग लहान होता. त्यामुळे तिथे मलप्पा धनशेट्टी प्रभूतीची भेट होई. कवीची व या सर्वांची शेवटची भेट तेथे झाली. त्याकाळी प्रत्येक ठिकाणी तुरूंगातही कुंजविहारी कोण आहेत हे लोकांना कळत असे. येरवड्यात तर रे टिळकांचे काव्य वाचणारा एक ख्रिश्चन वॉर्डर होता. त्याने कुंजविहारीचा मोठेपणा जाणून त्याचा त्रास कमी करण्याचा प्रयत्न केला. इकडे धनशेट्टी प्रभूतीच्या अपीलात हायकोर्टात न्यायमूर्तीचे मतभेद झाले तरी इंग्रजी न्यायाधिशांच्या बहुमताच्या जोरावर त्यांना दोषी ठरविण्यात आले. ते निरपराधी असल्याचे सर्वांना ठाऊक होते. तरी त्यांना १२-१-१९३१ रोजी येरवड्यात फाशी देण्यात आले. त्या दिवशी महाराष्ट्र नव्हे तर सर्व देश हळहळला. त्या दिवशी सकाळी आलेला पोष्टमन ही बातमी सांगून ५ मिनिटे रडत बसला. त्याच दिवशी सोलापूरच्या कैद्यांना विसापूरला नेण्यात आले. तेथे हुतात्म्याच्या फाशीच्या १० व्या दिवशी संध्याकाळी सूतक म्हणून सर्वांनी अन्न घेण्याचे नाकारले व या कटाचे सूत्रधार कोण म्हणून तपास सुरू झाला. त्यात कुंजविहारींना गॉल्व्हिन या तुरूंग प्रमुखासमोर उभे करण्यात आले. तो आयरिश होता व त्याला या प्रकरणातील सर्वांच्या भावना समजल्या. इतकेच नव्हे तर कवी कोण आहेत हेही या परक्या माणसास समजले. त्याने कवींना मामुली शिक्षा दिली व नंतर कवीच्या भावाला बोलावून घेतले आणि कवींनी तुरूंगात पुरुषार्थावर

वाचन, लेखन करावे असा सल्ला दिला. त्याप्रमाणे कवीनी तुरूंगात संत वाङ्‌मयाचा अभ्यास सुरू केला व त्या अभ्यासाचा काव्यावर फार मोठा परिणाम झाला.

"कारावासात असता ते गंमतीने सहकाऱ्यांना म्हणत, 'कम खा, गम खा' ही वृत्ती कारावासातील लोकांच्याकडे असायला हवी. हे सूचित होते." संदर्भ-[११]

हनुमान जयंतीच्या दिवशी (दि.२-४-१९३१ असावा) कवी तुरूंगातून सुटले. मार्च मध्ये गांधी आयर्विन करार झाला होता. महात्मा गांधींच्या आग्रहामुळे रामभाऊ राजवाडे याची सुटका झाली. नंतर पुण्याला तात्यासाहेब केळकरांच्या अध्यक्षतेखाली राजवाडे, डॉ.अंत्रोळीकर व कुंजविहारी यांचा जाहीर सत्कार झाला. कारावासाची तमा न बाळगणारा राजभक्त सेनापती बापटांच्या कारावासावर आधारित 'तयाला तुरूंग भिववील किती" ही कविता लिहिली. कारावासाची तमा, भीती नसणारे कुंजविहारीचे मन त्यातून दिसून येते.

**८) सामाजिक कार्य -**

कुंजविहारीच्या जीवनाचे तीन कालखंड जाणवतात. प्रत्यक्ष स्वातंत्र्य लढ्यात सहभाग (१९२० ते १९३१) राष्ट्रीय शिक्षण शाळेचा प्रयोग (इ.स.१९३२-३५) आणि महात्मा गांधी प्रणित लोकराज्याला आवश्यक असणारे सामंजस्य व समाजमन घडविण्यासाठी, 'ओनामा' सारख्या विविध सामाजिक व साहित्यिक संस्थांतून प्रयत्न (१९३५ ते ७८) तीन टप्प्यांमध्ये तिसरा टप्पा सामाजिक कार्याचा कालावधीने, कार्याने तो टप्पा मोठा आहे.

इ.स.१९३५ च्या कायद्याने स्वातंत्र्य चळवळीचे स्वरूप बदलले. व्दिदल राज्यपध्दती आली. निवडणुका आल्या. गांधीजींनी (काँग्रेसचे) राष्ट्रसभेचे रूपांतर राजकीय पक्षात करावे; लोकशाहीला पोषक समाज निर्माण करण्याचे कार्यावर भर

द्यावा. अशा सूचना केल्या होत्या. कुंजविहारी वृत्तीने व विचाराने गांधीवादी होते. त्यांनीही गांधीजींच्या सुचनानुरूप कार्यपध्दती बदलली. आणि अखेरपर्यंत त्यांनी सामाजिक व साहित्यिक कार्यास वाहून घेतले. सांपत्तिक प्रतिकुलतेतही निष्ठा, सद्‌भाव आणि निरपेक्षवृत्तीच्या कार्याचा कणा होता. ते अनेक चळवळीचे कल्पक, प्रेरक, सहाय्यक आणि संयोजक होते. मात्र त्यांचा पिंड स्वयंसेवकाचा होता. स्वकीयांचे शासन येणार याचा आनंद ही त्यांची नवी प्रेरणा होती." [१२]

देशकार्यातही स्वत्वाची व स्वकर्तव्याची धारणा ते विसरू शकले नाहीत. राजकारण हे संघटनेचे असावे असे त्यांना वाटे कुटुंबसंस्था नंतर ग्रामसंस्था सुधारल्या पाहिजेत त्याशिवाय राष्ट्राला तरणोपाय नाही हे ओळखून त्या दृष्टीने त्यांनी श्रम घेतले आहेत. असंख्य खेडोपाडी पायी तुडवून तेथे कीर्तन, पोवाडे त्यांच्या व्दारा जागृती निर्माण केली आहे. सर्व खेडी संघटनेने बांधली जावीत, प्रत्येक खेड्यात वाचनालय असावे अशा प्रकारची जागृती संतवाड्.मय याच्या द्वारा राष्ट्रीय कवितांच्या द्वारा करावी असा कवीचा एक जीवन हेतू आहे.

इ.स.१९२७ ला तरूण राष्ट्रीय मंडळ अर्थात युवक संघ स्थापन केला.

कुंजविहारींनी 'ओनामा मंदिर' लोकशिक्षण संस्थेची स्थापना केली.

यानंतर कवींनी हरिजन वस्तीत शिक्षणासाठी रात्रीच्या शाळा काढल्या. त्या शाळा पुढे नगरपालिकेने चालवण्यास घेतल्या.

त्याचवर्षी इ.स.१९३६ मध्ये कवींनी श्री.वि.स.खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिले साहित्य संमेलन भरवले.

महादेव गोविंद रानडे शतसांवत्सरिक उत्सव केला. ज्ञानेश्वरी ६६० वा महोत्सव केला.

सर्वधर्म परिषद भरवावी ही कुंजविहारींची प्रबळ इच्छा होती.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

विमा एजंट संघटना केली.

बाल मेळा आयोजित केला.

खेड्यातून प्रचार यात्रा काढली.

श्री.शिवजयंती उत्सव साजरा केला.

रामकृष्ण परमहंस उत्सव केला.

ज्ञानेश्वरी बाल मेळा आयोजित केला.

अशा अनेक संस्थांचे जनक होते. त्या संस्थांतून नवे समाजमन घडविण्याचा प्रयत्न केला. छोट्या पुस्तिका प्रसिध्द केल्या. लोकशाही समाजाला पोषक सहकार, सहजीवन, समता, ममता, स्वातंत्र्य, विनयशीलता, विकसनशीलता, विधायक वृत्ती रूजविणारी, वाढविणारी आणि स्वार्थीपणा, व्यक्तिवाद, भ्रष्टाचार, दारिद्र्य तसेच 'रावणी व दुर्योधनी' प्रवृत्तीचा निषेध करणारी कविता या प्रदीर्घ काळात लिहिली आहे.

"कुंजविहारींनी सामाजिक कार्यात सहभाग घेतला याचे कारण त्यांच्यावर गांधीजींच्या तत्वाचा पगडा जास्त होता. तसेच महाराष्ट्रातील चळवळीचा पगडा होता." संदर्भ-[१३]

**९) वाड्.मयीन संस्कार व काव्यलेखनाची प्रेरणा -**

मूळचा साहित्यिक पिंड आणि त्या स्वयंप्रेरित संवेदनशील कार्यप्रवण मनावर पारतंत्र्यातील राष्ट्रीय जागृतीच्या वातावरणाचा, उंबरीकर, गोविंद यासारख्या व्यक्तींचा, संतवाड्.मयाचा परिणाम झाला. म्हणून या स्वातंत्र्य शाहीर कुंजविहारींनी कविता लिहिल्या व त्या लोकांना गाऊन दाखविल्या.

"कवीचा समंजसपणाचा काळ इ.स.१९१२ ते इ.स.१९२२ वयाची १६ ते २६

वर्षे त्यांच्या काव्य कर्तृत्वाच्या दृष्टीने महत्त्वाची आणि हा काळ खरोखर होताही रोमांचकारी. टिळकांच्या कर्तृत्वाचा तो ऐन बहर. होमरूल चळवळी होत होत्या. सावकार चमकून गेले होते. महात्मा गांधीचे सत्य अहिंसेचे प्रयोग सुरू होते. हिंदू मुस्लीम ऐक्याच्या वाटाघाटी सफल झाल्या होत्या. खिलाफतीची चळवळ सुरू होती. पहिले महायुध्द भडकून शांत झाले होते. हिंदुस्थानात सुधारणांचे दोन हप्ते मिळाले होते. सत्याग्रहांचे नवे शस्त्र मुळशीत चालवले जात होते. वृ.प.खाडीलकर, ह.ना.आपटे, शि.म.परांजपे, ना.चि.केळकर, जोशी यांच्या वाङ्.मयात ज्वलन्त देशाभिमान रसरसत होता. 'गीतारहस्याचे' नाद घुमत होते व बाबू अरविंद घोष, ॲनी बेझंट यांच्या वैशिष्ट्यपूर्ण ईश्वरी जागृतीचा तो काळ होता. राष्ट्रीय काव्याचा तो काळ होता. सन्मित्र समाज मेळ्यांतील पदांपासून कवी राष्ट्रीय भावनेने लिहित होते." संदर्भ-[१४]

यात भर म्हणजे श्री.रामचंद्र बालाजी नाईक उंबरीकर-सराफ हे कवींच्या धर्मपत्नी सौ.अहिल्याबाई यांचे चुलते होते. त्यांच्याच सहवासाने कुंजविहारी यांना कविता लिहण्याचा छंद लागला. रामकाकाच्या कवितेचा पगडा त्यांच्या कवितेतून पहावयास मिळतो. तसा त्यांचा उल्लेखही कवींनी 'सोलापूर वर्णना' मध्ये केला आहे.

'उंबरीकर राम' कवींच्या मस्तक वाहुनि पदावरी

सोलापूर-वर्णन हे गाइन सद्भावे मज साह्य करी।" गीत पृ.२९

कुंजविहारींनी इ.स.१९१८ साली काव्यलेखनास प्रारंभ केला. 'कधी रे आता भेटसी रामराया' ही त्यांची पहिली कविता. एथपासूनची हे कविता लेखन अव्याहतपणे चालू ठेवले. स्वातंत्र्यपूर्व ते स्वातंत्र्योत्तरही एवढेच नव्हे तर शेवटी अर्धांग वायूचा झटका आला तरी ते त्यांच्या कवितेला विसरले नाहीत.

विसापूरचे तुरूंगप्रमुख गॉल्व्हिन हा आयरिश होता त्याने कवीला सल्ला दिला 'कवींनी, तुरूंगात परमार्थवर वाचन-लेखन करावे' त्याप्रमाणे कवींनी तुरूंगात



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

संतवाड्.मयाचा अभ्यास केला व त्याचा त्यांच्या काव्यावर परिणाम झाला. राष्ट्रीय कवितेला अध्यात्माची जोड मिळाली. यामुळे ती अधिकच गहिरी बनली.

कवीला काव्यस्फूर्ती देणाऱ्या आणखी दोन व्यक्ती प्रमुखतः सोलापूरचे शाहीर रामजोशी व नाशिकचे स्वातंत्र्य शाहीर कवी गोविंद. 'अधरी धरी मुरली' हे गोविंदाचे काव्य कवीला स्फूर्ती देण्यास कारण ठरले. १९३० साली तुरूंगात असताना संतवाड्.मयाचा अभ्यास झाला आणि कवीच्या विचारांना वेगळे वळण लागले.

संत ज्ञानेश्वर, समर्थ रामदास यांच्या काव्याचा परिणाम त्यांच्या काव्यावर विशेषतः झाला." संदर्भ-[१५]

या काळात कवीची प्रतिभा पालवत होती. इ.स.१९२३ सालापर्यंतच्या राजकारणात यथाशक्ती त्यांनी भाग घेतला. सोलापूरचे द.म.सामंत/कर्मयोगी राजवाडे हे आधीचे पुढारी आणि अंत्रोळीकर, कुर्बान हुसेन, शिंदे, धनशेट्टी इत्यादी नंतरच्या सहकाऱ्यांबरोबर कुंजविहारींनी देशकार्य केले. ही देशकार्य करण्याची स्वयंप्रेरणा हीच खरी काव्यप्रेरणा आहे असे त्यांचे निकटवर्तीय सांगतात. देशकार्य करण्यासाठी जे जे म्हणून विषय होईल ते ते काव्यातून मांडत. जनसमुदायासमोर स्वतः गाऊन कविता म्हणून दाखवत कारण कवितेतला विचार लोकांच्या मनावर बिंबवण्यासाठी प्रचार व प्रसार ही काव्य लेखना मागची भूमिका स्पष्ट दिसून येते.

"सोलापूरचे पहिले साप्ताहिक 'कल्पतरू' इ.स.१८६६ मध्ये गोविंद काकडे यांनी सुरू केले. तसेच कुंजविहारी विषयी सांगताना त्यांचे पुत्र वि.गो.काकडे म्हणतात- "तुम्हाला कुंजविहारी कवी म्हणून माहित आहेत पण आम्हाला ते लेखक म्हणून जास्त परिचीत आहेत" कारण कुंजविहारी लेख लिहीत. त्यांचे लेख चालू घडामोडीवर असायचे. लेख लिहण्यामागे एकच उद्देश होता तो म्हणजे स्वातंत्र्य मिळवणे. तसे वातावरण निर्माण करणे तसेच नव्या साहित्यिकाला प्रेरणा देणे जनमानस तयार करणे.

कुंजविहारींच्या वाड्.मयीन संस्काराविषयी आणखी, एक आठवण वि.गो.काकडे यांनी सांगितली, - "कुंजविहारी काकडे निवासस्थानी दिवसातला बराच वेळ घालवत" कल्पतरू मध्ये सोलापूरातील साहित्यिक कवी यांचा दररोज 'अड्डा' असायचा. साहित्य, राजकारण, समाजकारण याबद्दल चर्चा, वादविवाद होत असत. कुंजविहारींची न चुकता हजेरी असायची. पुढे पुढे त्यांच्या बसण्याच्या जागेस 'कविकट्टा' असे नाव पडले. आज निवासस्थान कल्पतरूची बिल्डींग पाडून त्याठिकाणी 'भगवानदास कॉम्प्लेक्स' झालेले आहे." संदर्भ-[१६]

आणखी एक मुद्दा नमूद करावा वाटतो तो म्हणजे गुरूपरंपरा, मित्रपरिवार व शिष्यसंप्रदाय गुरू  कै.राजाभाऊ उंबरीकर, कमलाकर रामचंद्र सुमंत, कल्पतरूकार कै.गोविंद काकडे, कै.गं.गो.परिचारक वकिल/साहित्यिक, कै.प.मा.कामतकर, कै.शं.गो.पटवर्धन, कवी द.रा.बेंद्रे, हुतात्मा कुर्बान हुसेन, कै.वि.रा.पाटील, महाजन वकील, कै.बाबासाहेब वारद, कै.माणिकचंद शहा असा अगणित स्नेही परिवार होता.

कै.ल.गो.जोशी (नृसिंहाग्रज) दत्ता हलसगीकर, रा.श्री.पंचवाद्य हे कुंजविहारींना गुरूस्थानी मानतात.

अशाप्रकारे वाड्.मय संस्कार व वाड्.मयप्रेरणेने कुंजविहारी राष्ट्रीय कवी लेखक म्हणून सर्वांना परिचित झाले.

## १०) वाड्.मयीन कार्य -

कुंजविहारींच्या सामाजिक कार्याबरोबर वाड्.मयीन कार्य मोलाचे आहे. या कार्यामुळे त्यांनी सांस्कृतिक ठेवा निर्माण केला.कुंजविहारी यांच्या साहित्यकार्याचा आढावा घेत असता त्यांनी इ.स.१९३६ मध्ये श्री.वि.स.खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली पहिले जिल्हा साहित्य संमेलन भरवले. इ.स.१९३७ साली 'राज्यश्री' वाचनालय सुरू

केले. मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली हा उपक्रम झाला.

इ.स.१९४१ मध्ये श्री.वि.स.खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली पंचविसावे महाराष्ट्र साहित्य संमेलन सोलापूरात भरले. त्याचे एक चिटणीस व प्रमुख प्रवर्तक कुंजविहारी होते. त्यांनी या संमेलनात छोट्या बालगोपालांसाठी मोठ्या साहित्यिकांशी भेट करून देण्याचा अभिनव कार्यक्रम आखला व तो फार यशस्वी झाला.

कविराय सरस्वती सेवा मंडळ स्थापले.

वाङ्.मयविहार व्याख्यानमाला चालू ठेवल्या.

स्थानिक साहित्यसंमेलन अर्थात शारदोत्सव साजरा केला.

'सारथी' वृत्तपत्र सुरू केले.

'राजश्री' मासिक सुरू केले.

१९४६ साली प्राचार्य सोनोपंत दांडेकर यांचे अध्यक्षतेखाली संत वाङ्.मय संमेलन कुंजविहारींनी सोलापूर येथे घडवून आणले.

आणखी ज्ञानेश्वरांपासून सर्व संतांचा आणि त्यांच्या ग्रंथांचा अभ्यास सतत चालावा अशी योजना केली. संताच्या आशीर्वादाने त्यात यश येईल असा भरवसा होता. पण ती अपूर्ण राहिली. कुंजविहारींनी 'कविता' हे उपजीविकेचे साधन मानले नाही. 'गीत गुंजारव' इ.स.१९४८ साली मित्र मंडळींनी निधी जमवून प्रसिध्द केले. त्या निधीतील शिल्लक राहिलेली रक्कम मॅट्रीकच्या परिक्षेत सोलापूरात पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्यास बक्षीस देण्यासाठी वेगळी ठेवली होती.

नाशिकचे कवी गोविंद आणि बेळगावात 'तरूण भारत' यांना सहाय्य म्हणून अनुक्रमे रूपये १०१/- व रू.५००/- पाठविले ते 'मुळशीचा पाळणा' व 'भेटेन नऊ महिन्यांनी' या कवितांची 'एक पैसा एक प्रत' अशी विक्री करून !

ज्ञानेश्वरी सन.१२१२ मध्ये लिहिली गेली. या घटनेला १९५० मध्ये म्हणजे शके

१२७२ मध्ये ६६० वर्षे होतात. त्यावेळी ज्ञानेश्वरीचा ११ वा हीरकमहोत्सव षठ्यव्दीपूर्ती समारंभ करावा अशी इच्छा होती.

कुंजविहारींचे जीवन काव्यमय म्हणजे सहृयतेने भरलेले आहे. आपल्या 'स्वागत सुमनांजली' या कवितेत म्हटले आहे-

"सुजन मनधन रसिक सभा ही प्रेमे म्या पुजिली
वाहुनी स्वागतें सुमनांजली
नसुनि सत्यसंकल्प रूपिणी मानवता मंगळा
साजरा करू वाङ्.मय सोहळा" आ.पृ.५१

या वाङ्.मय सोहळ्याची सुरूवात करून नव्या कवीचे आशास्थान व नव्या कार्याचे स्फूर्तिस्थान बनले आहेत.

वारकऱ्याला तलवार घ्यायला लावली असे त्यांचे वाङ्.मयीन कार्य होते.

इ.स.१९६१ साली श्री.रवींद्रनाथ टागोर यांच्या शतसांवत्सरिक जयंती उत्सवाच्या निमित्ताने 'ओनामा मंदिराच्या' वाङ्.मय प्रयोजन पुस्तक प्रकाशन योजनेचा संकल्प करण्यात आला व या ध्येय धोरणानुसार 'श्री शिवयोगी सिध्देश्वर','श्री संतकवि शुभराय','श्री रामजोशी' आदी पुस्तिका काढल्या.

त्यांच्या या वाङ्.मयीन कार्याविषयी दयानंद कॉलेजचे प्रिन्सिपॉल भगवानदास म्हणतात -

"भले हम दूर की बातों की ओर दौडते है. और हमारे समीपतर होनेवाली बातोंको और बडप्पनको भूल जाते है। भारतीय संस्कृतीने न जाने कितने त्यागी तपस्वी और महात्मा निर्माण किये। धन्य थे वे महापुरूष। और धन्य है कवि कुंजविहारीजी। जिन्होने उनके बडे बडे विचार घर घर पहुचानेके लिये छोटी छोटी पुस्तकाये प्रकाशित करनेका बडा सुंदर कार्य अपने हाथमे लिया है।ईश्वर उन्हे संकल्पित कार्य मे सफलता

दे।"संदर्भ-१७

अशाप्रकारे वाड्.मय निर्मिती बरोबर सोलापुरात वाड्.मयीन वातावरण निर्माण व्हावे म्हणून कवी कुंजविहारी ५० वर्षे प्रयत्नशील होते.

**११) व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये -**

**१) ध्येयवाद -**

कुंजविहारींच्या जीबनाचा एक आणि एकच ध्यास होता. तो म्हणजे या मातृभूमीला परदास्यातून सोडविणे. त्यासाठी देशकार्य करण्याची कोणतीही संधी त्यांनी सोडली नाही. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, वाड्.मयीन आदी सर्व पातळ्यावरून स्वतःच्या कुटुंबाचा विचार न करता देशकार्यात वाहून घेतले. नंतर सुराज्य होण्याचा ध्यास घेतला. त्यांचे काव्य त्यांच्या जीवनाचा विचारांचा आरसा आहे. त्यांची ध्येयाविषयीचा विचार त्यांच्या काव्यातही आपल्याला पहावयास मिळतो.

इ.स.१९१९ च्या गिरणी संपाच्या वेळेस 'माझे ध्येय' ही कविता लिहली.

"ध्येय एक निश्चित् झाले
मी सेवक त्या राष्ट्राचा...
... त्या लोकमान्य टिळकाचा
अभिमान हेच वदण्याला
की सेवक मी राष्ट्राचा" आ.पृ.२

हे ध्येय निश्चित करून 'राष्ट्राचा सेवक' या नात्याने आयुष्यभर त्यांनी सामाजिक आणि राष्ट्रीय जाणिवेतून जनतेला आवाहन करून जागृत करण्याचे कार्य केले. जनजागरणास्तव कविता केल्या. सभे-सभेतून खड्या आवाजात गाऊन दाखविल्या.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

उत्सवातून मुलामुलींच्या मेळ्यातून पुन्हा पुन्हा जनतेस ऐकविल्या. या कालखंडातील कविता देशप्रेमाने, वीरश्रीने ओथंबलेल्या आहेत.

कवी कुंजविहारींना वाटते की आपण स्वातंत्र्याचा ध्यास घेतला आहे. तो ध्यास मातृभूमीनेच घेतला आहे. तिने रणवीरांचा ध्यास घेतला आहे. याचे वर्णन त्यांचे 'संध्या' या कवितेमध्ये आलेले आहे.

आपल्या ध्येयावर कवी एकनिष्ठ राहिले आहेत. याचे वर्णन 'श्री सत्यविनायक' या कवितेतही पहावयास मिळते.

"आयुष्याचे ध्येय तयाचे एकचि ठरलेले
परक्याला मुळि येऊ न देणे प्राण जरी गेले।" आ.पृ.१९

ही कविता केवळ पौराणिक कविता आहे असे कोण म्हणेल? प्रत्येकांनी स्वतंत्रतेची प्रेरणा घ्यावी ही मागणी कवी गणेशाला मागत आहेत. कुंजविहारींची स्वातंत्र्य मिळण्याची तळमळ ही आर्त होती. त्यांची ही तळमळ, हे मूक मनोरथ 'रत्नागिरी परिषदेतूनही' जाणवते. तसेच स्वातंत्र्यासाठी कुणी पुढे जात असेल तर त्याला कवी 'टाक पुढे पाऊल' असेच सांगतात. कारण देशाचे स्वातंत्र्य तेच मिळविणार आहेत. म्हणून त्याना स्फूर्ती देण्यासाठी 'जयहिंद' कवितेमध्ये म्हणतात -

"श्री शिवयुगधर्माचा घेई रणवेष
गीता सुभाषितांचा सुभाष संदेश
क्रांतिप्रिय तरूणांचा ज्वलंत आदर्श
कुंजविहारी अंतरि निशिदिनी हा ध्यास" आ.पृ.५६

या ध्येयपूर्तीला तेंव्हाच अर्थ येईल जेंव्हा सुराज्य होईल. 'सुराज्य झाल्याविना' या कवितेत ती भावना आली आहे. "सुराज्य झाल्याविना व्रताची कधी न हो सांगता" आ.पृ.६१

भारत पारतंत्र्यात असता कवीचे ध्येय स्वातंत्र्य मिळविणे तर नंतर त्याचे सुराज्यात रूपांतर करणे तर सर्व भारतीय सुखी कसे होतील याचा विचार होता. खरी लोकशाही त्यांना अभिप्रेत होती. आणि राजा प्रजेचा सदाचार असेल तरच भारतीय लोकशाही जगात चिरंजीव होईल. ही भावना 'चिरंजीव लोकशाही' या कवितेत दिसते. यासाठी सदाचार सद्‌गुण हा काही काळ असू नये तर कायम असावा. 'युगवीर भावना' या कवितेत याविषयी स्पष्ट केले आहे.

वरील सर्व तत्त्वांचा आदर करून ती कृती केली तर अत्यंत पवित्र व्रत साकार होईल असे 'मंगल आरती' या कवितेत सांगतात - "अति पवित्र व्रत तव सकळ लोक कल्याण" आ.पृ.८४

म्हणूनच कवी पुन्हा पुन्हा सांगताना दिसून येते. ते 'तरूण भारतास' या कवितेमध्येही जाणवते.

मातृभूमीच्या उध्दारासाठीच देह दिला आहे. देश स्वतंत्र्य करण्यासाठी कितीही त्रास झाला तरी तो सहन करण्याची शक्ती दे, प्रेरणा दे असे ईश्वराला प्रार्थना करतात. कारण स्वतंत्रता सर्व काही आहे. आपल्याला वाटते मी माझ्या घरात स्वतंत्रच आहे पण ती स्वतंत्रता कसली? देश पारतंत्र्यात तर मग घर सुध्दा तुरूंगच आहे! मग आपण गप्प का? त्यासाठी सर्वस्व समर्पित करा. तसेच या पारतंत्र्याची जाणीव नसणारांना मी माझ्या स्वतंत्रतेच्या ध्येयानेच प्रेरित झालेल्या कवितेने प्रेरणा मिळावी हाच एक ध्यास कविता लिहण्यामागचा आहे.

**२) राष्ट्रभक्ती -**

स्वातंत्र्य मिळविणे व त्याचे सुराज्य करणे हे ध्येय कुंजविहारींचे होते. ते पूर्ण करण्यासाठी काया वाचा मन, लेखन या सर्व शक्तींचा उपयोग केला. अशी राष्ट्रभक्ती

त्यांच्याकडे होती. अशा राष्ट्रभक्तांमुळेच देशाला स्वातंत्र्य मिळाले. तसेच काही प्रमाणात सुराज्य झाल्याचे पाहता आले.

कुंजविहारी यांच्या कार्याप्रमाणेच त्यांच्या काव्यातील राष्ट्रीयता ही स्थायी भावना आहे. 'देहसुमन वाहून, स्वार्थ धूप जाळून-' राष्ट्राची मी सेवा करून ही कवीने प्रतिज्ञा इ.स.१९२० साली घेतली. यातून कवीची देशाबद्दलची भक्तीच व्यक्त होते. हे सेवावृत्त अमरण सत्तेपासून दूर राहून टिकविले.

दत्ता हलसगीकर त्यांचे भाचे, शिष्य. कुंजविहारी विषयी म्हणतात - "त्यांच्याकडे आलेली राष्ट्रीय वृत्ती, वातावरणामुळे आली. वातावरण हेच राष्ट्रीय कविता लिहण्यास प्रेरणादायी ठरले. मूळात राजकारणाचा त्यांचा पिंड नव्हता." संदर्भ-[१८]

हे म्हटलेले जरी बरोबर असले तरी एखाद्या बिजाने वृक्षाला साठवून ठेवलेले असते. योग्य वातावरण मिळाले की, ते आपोआप अंकुरते. याचा अर्थ त्यांच्याकडे राष्ट्रीय वृत्ती नव्हती असा होत नाही.

ध्येय पूर्ण करण्यासाठी हा सच्चा राष्ट्रभक्त क्रांती करावी लागली तरी चालेल परंतु हे परवशतेचे जीने नको आहे. याच प्रकारचा आशयही त्यांच्या 'श्री सत्यविनायक' आणि 'सवाल' या कवितेतून दिसतो. अनुक्रमे-"परक्याला मुळी येऊ न देणे प्राण जरी गेले"

"स्वातंत्र्याची नौका जाते रक्तनदींतुनि पैलतिरी आ.पृ.१९

सर्व जगाच्या इतिहासाची एकवाक्यता असे पुरी।" आ.पृ.१६

कारण राष्ट्र, देश ही आमची माऊली आहे. राष्ट्राची सेवा करावयाचीच असेल तर स्वतंत्रता शांती यावयाला तरी हरकत नाही. अशा भावना त्यांच्या 'रत्नागिरी परिषद', 'निसर्गगीता स्फूर्ती' या कवितेतून दिसून येतात.

ही राष्ट्रभक्तीची ओढ इतकी आहे की ज्याप्रमाणे भक्त काया, वाचे, मन, धन

ईश्वराला अर्पूण ईश्वराची प्रीती भक्ती प्राप्त करतो तसेच हा राष्ट्रभक्त राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पूण करतो व इतरांनीही करावे म्हणून 'तरूण भारत' या कवितेतून इतरांना संदेश देतात, -

"राष्ट्रकार्यि तन-मन-धन अर्पूनि अजरामर सत्कीर्ति करू" आ.पृ.२३

"इ.स.१९२३ सालच्या फेर-नाफेर वादाच्या दुफळीमुळे कवींचे मन दुःखावले त्याच सुमारास कौटुंबिक आपत्तीही कवीवर आल्या. आपत्ती कोसळल्याने व पक्षनिष्ठ राजकारणातून अंग काढून घ्यावयाचे कवींनी ठरविले अर्थात राष्ट्रीयता रक्तात बाणली गेली असल्यामुळे ते तसे झाले मात्र नाही. त्यामुळेच इ.स.१९२८ मध्ये त्यांची नोकरी गेली. पुन्हा त्यांनी नोकरी केली नाही." संदर्भ-[१९]

बड्या-बड्या भांडणात न पडता राष्ट्राची सेवा घडावी हे कवीचे ध्येय आहे. हा कवीचा धर्म आहे. त्यासाठी कवी अनेक वेळा मरायला तयार आहेत, अनेक वेळा जन्मायला तयार आहेत. त्यांच्या जीवनाच्या सत्य संकल्पना मागे भगवान उभा आहे यात शंका नाही.

'राष्ट्राचा सेवक' हे ध्येय निश्चित झाल्याबरोबर 'जन्मले जे आर्यभूमीत । ते सारे गंधर्व झाले' आ.पृ.२ अशी त्यांची मनोधारणा झाली आणि

'जनी जनार्दन भरला, श्रीकृष्ण सखा भगवान ।
ना दिसे कळेना । काही, परि हृदया पटली खूण ।।
प्रेमाने पुजुनि त्याला, पदी देह सुमन वाहीन।। आ.पृ.३

ह्या दृढ भावनेने कुंजविहारींनी देशसेवेला वाहून घेतले.

**३) साधेपणा -**

स्व-स्वभाव आणि गांधीजींच्या शिकवणुकीचा परिणाम यामुळे कुंजविहारींचे

अंतर्बाह्य जीवन साधेपणाचे होते.

साधेपणा कुंजविहारींच्याकडे कसा होता याविषयी दत्ता हलसगीकरांच्याच शब्दात - त्यांची राहणी अत्यंत साधी होती. जुन्या राजवाड्यातील दोन खोल्यांमध्ये त्यांचे आयुष्य ५ मुलींचा हा पिता शांत/समाधानी/अनाग्रही होता. धोतर, सदरा, टोपी, पंचा हा त्यांचा पोशाख होता. त्यांनी कधीही भारी कपडे घातली नाहीत. बोलण्याची पध्दती कवी सारखीच असे. 'सुहासिनीला कुंकू तसा आम्हाला चहा' रोजचे घरचे जेवण त्यांना आवडायचे. ते शुध्द शाकाहारी होते. चालत राहणे हा एक त्यांचा नित नियम असायचा.

तसेच त्यांची मुलगी कु.वसुंधरा सलगरकर यांच्याच शब्दात त्यांच्या साधेपणाविषयी - साधेपणा त्यांच्या अंगात भिनला होता. कुणी बोलावले तर आहे त्या वेषात निघत. कोणत्याही वाहनाची वाट न बघता पायी चालत. स्वातंत्र्यानंतर गांधींच्या तत्त्वाचा जणू लिलावच झाला. सत्तेचा स्वार्थ इतरत्र दिसू लागला. म्हणून कुंजविहारींनी लोकांचा विचार बदलला. म्हणून याचा निषेध म्हणून गांधी टोपीऐवजी लाल टोपी वापरली. अतिशय साधी राहणी, कोणताही डामडौल त्यांच्याकडे नव्हता. अहंकार त्यांच्याकडे नव्हताच. स्वातंत्र्य मिळाले अनेकांना सत्ता उपभोगण्यास मिळाली. नेहरूंनी कुंजविहारींना 'तुम्ही निवडणूक लढवा' अशा आशयाचे पत्र लिहिले पण सच्च्या देशभक्त कुंजविहारी म्हणतात. "मी माझ्या कवितेचे भांडवल करणार नाही" या तत्त्वाने आलेल्या संधीला धुडकावून लावले व जे गरिबीचे जीवन असेल त्याचा स्वीकार केला केवढी ही साधी राहणी व उच्च विचारसरणी !

साधेपणा ही कुंजविहारींची जीवनसरणी होती. शरीर नटविण्यापेक्षा उगीच अवडंबर माजविण्यापेक्षा खरे सुख आहे ते आत्मशांती, आत्मजागृती व आत्मोन्नती. 'महावीर' या कवितेवरून कवींना साधेपणा किती प्रिय होता हे दिसून येते. एवढा मोठा राजा परंतु

सर्वस्वाचा त्याग करून साधेपणातून खरे जीवन स्वतः जगून इतरांना मार्ग दाखवला. तसेच आचार मानवाचा असावा हा कवीचा आग्रह ही आहे.

'भावसुमनांजली' मध्ये हीच भावना सांगताना कवी अहंकाराचा त्याग करावयास सांगतो. कारण तुला देह दिला तो नटविण्यासाठी नाही तर ईशतत्व आचरण्यासाठी तेच जीवनाचा आधार आहे.-

"कुणाचे न काही घेता अर्पिशी सर्वस्व
अनुपम दातृत्व हे भला भोळा दिसतोस" आ.पृ.११३

जिथे निःस्वार्थ तिथेच साधेपणा, जिथे साधेपणा तिथे साधुत्व, जिथे साधुत्व तिथे मानवता, जिथे मानवता तिथेच भक्त, जिथे भक्त तिथेच ईश्वर! ही पूर्ण विचारसरणी असल्याने कवींच्याकडे साधेपणा होता.

कल्पतरूचे संपादक वि.गो.काकडे यांना कुंजविहारी जाणवले ते साधे व सद्यस्थितीची जाण असलेले.

त्र्यं.वि.सरदेशमुख यांना जाणवलेले कुंजविहारी त्यांच्याच शब्दात - "कुंजविहारी एका जुन्याशा वाड्यात दोन खोल्यात मोठा संसार रेटत होते. त्यांच्या इतका शुल्लक व फाटका दिसणारा मनुष्य इतका दरियादिल खोल संवेदनेचा आणि दुःखभोगांनी विचलीत न झालेला मी पाहिला नाही. त्यांच्या रूपचर्येने, धोतर-शर्ट-टोपी या घरधुवट पोषाखाने आणि उदार, प्रेमळ वागणुकीने भल्याभल्यांना चकवले, खाली पहायला लावले."[२०]

**४) संकटाशी झुंज -**

संकटाला परतविण्यासाठी झुंज देण्याची वृत्ती कुंजविहारींकडे होती. म्हणूनच कोणत्याही पातळीवर कौटुंबिक, आर्थिक, शारीरिक, मानसिक संकटात पिचून न जाता शेवटपर्यंत आपल्या तत्वांशी एकनिष्ठ राहिले.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

"पारतंत्र्याच्या काळात संप नेहमी होत असत. टिळक व गांधी युगातील संप, मोर्चे, संघटना या सर्वांचा परिणाम त्यांच्या काव्यावर, विचारावर झाला. तरीही कुंजविहारींनी कुणालाही दुखावले नाही. कुणाबरोबर वैर केले नाही. वाकुडपणा घेतला नाही."

पण वेळ येताच त्यांच्याही विरूध्द लिहित. याच उदाहरण पुढीलप्रमाणे, - "कल्पतरू मध्ये कुंजविहारींनी गांधीजींच्या निर्णयावर एक लेख लिहिला होता. 'कनवाळू कसाई' याचे कारण असे की, आश्रमामध्ये वेदनेने तडफडणारी गाई होती. तिला मारावे की नाही? असा प्रश्न निर्माण झाला तेव्हा मारावे या निर्णयावर गांधीजी आले. तसे सांगितले म्हणून कुंजविहारींनी लेखात स्पष्ट भूमिका घेतली. अहिंसेचे तत्व पाळणाऱ्यांनी हा सल्ला कसा दिला? म्हणजे हे कनवाळू कसाईच की !"[२१]

माझे ध्येय या कवितेमध्ये कवी म्हणतात -

"संकटे ग्रासिले तिजला । परि मानसी भ्याली नाही ।

विश्वास प्रभुपदी धरूनी । प्रसवली पुत्र भूमाई ।।" आ.पृ.२

स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर कवी 'भारतास' या कवितेमध्ये म्हणतात - 'या रडव्या रणगीतांनी कार्यभाग नाही होत' आ.पृ.५ दावूनी पराक्रम बरवा. क्रांती करण्यासाठी मनांना पेटविण्यासाठी त्यांचे शब्दही तीव्र होतात. तसेच सुदिन कवितेतही म्हणतात की शिवरायांचाच बाणा स्वीकारायला पाहिजे तसेच संकटाला परतवून लावण्यासाठी 'जयहिंद' कवितेत म्हणतात -

"संकट कंटक पदतील तुडवित बलशाली

दिल्ली चलो, गर्जना घुमवित भक्ताळी" आ.पृ.५६

'युगवीर भावना' या कवितेत कवी म्हणतात की, जर संकटातून उज्ज्वल जीवन मिळवायचे असेल तर त्याग व तपस्या केली पाहिजे. तेंव्हाच राष्ट्राची मंगलपहाट

आपण पाहू शकू. 'मंगलारती' या कवितेत कवी म्हणतात की झुंज वीरालाच शोभून दिसते.

जनजागृती म्हणजे मनामनाशी झुंज

झुंजार वीर मति प्रसन्न तेजपुंज।" आ.पृ.८४

स्वतंत्रता मिळेपर्यंत ही झुंजँ राहणार आहे, 'तरूण भारतास' मध्ये म्हणतात ही झुंज एका जन्माची नाही तर-

"देवाजीचे आम्ही लाडके मृत्यू आमुचा खेळगडी

देशासाठी मरू दहादा करू शेवटी कुरघोडी" आ.पृ.२२

कुंजविहारींच्या ६१ व्या वाढदिवसा दिवशी १०-११-१९५६ मित्र मंडळींनी सत्कार केला. त्यावेळचे त्यांचे मनोगत जणू जीवनभाष्यच आहे. "१९२० साली लो.टिळक सोलापुरास आले असताना मी या राष्ट्राचा स्वयंसेवक आहे असे जाहीर केले आणि त्यानंतर आज ३६ वर्षापर्यंत परमेश्वराने मला जिवंत ठेवले ही त्यांची कृपाच होय. या अवधीत मजवर संकटे आली पण माझे काही मित्र फासावर गेले/त्यांच्या मानाने माझी संकटे काहीच नाहीत ..... संकटे आली म्हणून मला हळहळ वाटली नाही. दारिद्र्याने मला आपला मित्र केले म्हणून मला निषाद वाटला नाही. माझ्या कुटुंबियांनाही दु:खे व हाल सोसावे लागले. त्या बद्दल मला विशेष काही वाटत नाही. संकट सोसावयास माझी सदैव तयारी आहे. या काळात लोकांचे जसे सहकार्य मिळाले तसे संस्था आणि संघटनाकडून मिळाले असते तर मला अधिक सार्वजनिक सेवा करता आली असती. पण ती माझ्या हातून
झाली नाही याचे मात्र मला वाईट वाटते....."[२२]

**५) अध्यात्माचे प्रेम -**

अध्यात्माचे प्रेम निर्माण झाले ते आईचे त्यावर संस्कार झाले. परिसरातील

आध्यात्मिक वातावरणामुळे आणि डोळसपणा आला तो तुरूंगातील संतवाड्.मयाच्या अभ्यासामुळे. अशाप्रकारे आध्यात्मिक प्रेम निर्माण झाले. या ज्ञानामुळेच प्रतिकूल परिस्थितीत अभिव्यक्तीचे साधन बनले आणि एक आध्यात्मिक पाठबळ मिळाले.

कुंजविहारींच्या मनात अध्यात्म रूजवला तो त्यांच्या आई गीताबाई यांनी. त्यांची आई धार्मिक होती. तसेच त्यांच्या घराशेजारी विठ्ठल मंदिर होते. अक्कलकोटला असता स्वामी समर्थाचे मंदिर होते. तसेच सिध्देश्वर, संत शुभराय यांच्या चरित्राचा परिणाम त्यांच्यावर झाला.

"अध्यात्म हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. पण कर्मकांडावर त्यांचा विश्वास नव्हता. अध्यात्म म्हणजे मानसिक सुचिता असे मानित ईश्वर हा माणसातच आहे. ही त्यांची धारणा होती. त्यांचे आचरण शुध्द होते. वाणी मवाळ आणि मधूर होती. एक सोज्वळ कनवाळूपणा त्यांच्या हृदयात होता." [२३]

कवीच्या मनात असणाऱ्या अध्यात्म प्रेमाची साक्ष म्हणजे त्यांची पहिली कविता

'कधी रे भेटसी रामराया' बहु साजिरी गोजिरी मूर्ति रामा।

वसे अंतरि नित्य आनंदधामा ।।

ढळे जेधवा दग्ध होईल काय । कधी रे भेटसी रामराया" ।।

तसेच कविची भूमिका 'पंढरीचा पांडूरंग' या कवितेत आहे. निर्गुण निराकाराची प्रचिती येते तेव्हा मनाला आनंद होतो. प्रश्नाचे कोडे सुटते. 'विश्व म्हणजे हे गणित निर्गुणाचे । गोड कोडे आणि अंतीम उत्तराचे' आ.पृ.३३ असे रूप पाहिल्यानंतर 'सुस्वागतम' या कवितेत ईश्वराला म्हणतात माझ्या हृदयात वास करा.

तू प्रेमळ परमेश्वरा

परि अससी चित्तचोर

मी मजला मुकल्यावर

कुठला संसार सार

म्हणूनि हृदी वास करी मम मनोहरा ।" आ.पृ.४२

कुंजविहारींनी अध्यात्मामुळे गणितच सांगितले आहे. कुंजविहारी 'रणांगणग्रंथ इथे संपला' या कवितेत म्हणतात -

प्रथम हरिकथा, स्वतंत्रता मग सावधानता पुढे मार्ग हा मुक्ति मंदिराकडे" आ.पृ.४३

तर 'बंडखोर स्फूर्ति' मध्ये राष्ट्रभक्ती पूर्ण होण्यासाठी कवी देवाला आळवतात

त्या देवीचे पुत्र म्हणवित खडतर वृत्त हे अती त्यांचा विश्वास ईश्वरावर एवढा आहे की, अध्यात्माच्या वाटेनेच स्वतंत्रतेचा मार्ग मिळेल. "अध्यात्माचा दंड तयावर तलवारीचे तेज चढे. धर्म अहिंसा व्रत सत्याग्रह सैन्य चालले पुढे पुढे" । आ.पृ.८८ असे धर्माचे अध्यात्माचे अधिष्ठान असलेली कवीची राष्ट्रभक्ती 'सैन्य चालले पुढे पुढे' या कवितेत दिसते. कुंजविहारींचा ओढा अध्यात्माचा होता. हे स्पष्ट दिसते. 'कबीर वचन ' या कवितेतून ते म्हणतात - "सर्वव्यापी सगळीकडे शोधत बसण्याची गरज नाही तो आपल्या अंतर्यामी आहे. तो भ्रांतीमुळे दिसत नाही. ज्याची शुध्द काया, वाचा असेल त्यालाच तो दिसेल."

'तुळशी वृंदावन' कवितेतूनही कवीची अध्यात्मवृत्तीच दिसून येते.

"दुःख दुजाचे दूर कराया दुःखीत मन जे झटे

तेच पुण्यफळ आत्मसुखाचे स्वरूप ते गोमटे" आ.पृ.९९

तसेच अर्जी कवितेतून ईश्वराला परतंत्रतेची प्रार्थना केली आहे.

वैयक्तिक मोक्षापेक्षा परवशतेतून मोक्ष त्यांनी चिंतीला आहे. हाच राष्ट्रधार्मिकता हा कवीचा विशेष होय. आणि याचा परिणाम म्हणूनच की काय त्यांच्या काव्यात शृंगाराचा अभाव आहे. सत्प्रवृत्तीमुळे त्यांच्या काव्यात अपूर्व मांगल्य निर्माण झाले आहेत.

### ६) आशावाद -

कुंजविहारी नवीन कवींचे व नवकार्याचे आशास्थान व स्फूर्तिस्थान बनले. कारण सामाजिक व वाङ्.मयीन कार्य पाहता त्यांनी अनेक नव्या कल्पनांना जन्म दिला.

कुंजविहारींच्या ठिकाणी इतका दुर्दम्य आशावाद आहे की, तो स्वातंत्र्योत्तर काळातही उपयोगीच पडणार आहे. कवीने एका ठिकाणी परवशतेलाच आमंत्रण दिले आहे. अधर्माला थैमान घालायला सुचवले आहे. त्यामुळे तरी आमच्यात चीड निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. त्यामुळे तरी धर्म संस्थापनेसाठी श्रीकृष्ण संभव नव्या युगात पुन्हा येईल अशी आशा त्यांना वाटते. जर हिवाळा खूप कडकपणे येत असेल तर वसंतही मागून येणार आहे. ही जाणीव कवींना आहे. म्हणून ते म्हणतात मरणाची भीति नाही, जन्मापूर्वी आम्ही मरणाचा करारनामा करून दिला आहे. 'तरूण भारतास' या कवितेमध्ये कवी म्हणतात -

"देवाजीचे अम्ही लाडके मृत्यू आमुचा खेळगडी

देशासाठी मरू दहादा, करू शेवटी कुरघोडी" आ.पृ.२२

'भेटेन नऊ महिन्यांनी' या लोकप्रिय कवितेत तर आशावाद पराकोटीचा आहे.'मजसाठी तिने सिंहासन निर्मियले। त्या एका खांबावरले ।" आ.पृ.२९ तसेच मी जरी आता फासावर जाणार आहे तरी पुन्हा नऊ महिन्यांनी येणार आहे. 'नव्या जगाच्या निर्मात्यांनो' स्वतंत्र भारताचे चित्र रेखाटले आहे. तर 'स्वराज्य सोहळा' यात स्वराज्याचा शुभ सोहळा आठवतो आहे. 'राजधानी' कवितेत दिल्लीचे वर्णन आले आहे. तर 'चिरंजीव लोकशाही' यामध्ये सुराज्य येईल आणि ही लोकशाही सर्वसामान्य होईल. तर उद्याचा देव असावा कसा? ते आदर्शवादी रूप रेखाटलेले दिसते. आदर्श 'रामराज्य' पुन्हा येईल अशी इच्छा व्यक्त केली आहे.

कुंजविहारींच्या काव्यात आशावाद दिसतो. कारण त्यांच्या जीवनातच आशावाद

होता. म्हणूनच कौटुंबिक, आर्थिक, मानसिक पातळीवर एवढी पिछेहाट असूनही त्यांनी जीवनाचा तोल कधी ढळू दिला नाही. हे पेलू शकते. केवळ दुर्दम्य इच्छा शक्ती असणाऱ्या व्यक्तींनाच ही शक्ती म्हणजेच आशावादी दृष्टिकोण होय.

## १२) साहित्य निर्मिती -

कुंजविहारी यांची साहित्य निर्मिती अल्प जरी असली तरी तिच्यामध्ये कार्यप्रवणतेची ताकद आहे. कुंजविहारींच्या लेखनाची सुरूवात कल्पतरू मधील लेखनाने झाली. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. लेख, कविता या साहित्य प्रांतात त्यांनी लिखाण केले. त्यांच्या लिखाणाविषयी सविस्तर परामार्श पुढील लेखनातून येणार आहेच.

त्यांच्या लेखनाची सुरूवात झाली ती 'कल्पतरू' या साप्ताहिकातून इ.स.१९१२ मध्ये 'गिरण्यांना दवाखाने पाहिजेत' या सामाजिक जाणीवेतून लिहिलेला त्यांचा पहिला लेख 'हरिहर' या नात्राने प्रसिध्द झाला. मिशल या नावानेही लिहित. कुंजविहारी हे नाटक पाहिल्यानंतर त्यांनी पुढे 'कुंजविहारी' या टोपण नावाने लेखन केले. एकूण १५० कविता त्यांनी लिहिल्या आहेत. शिवाय कल्पतरूमध्ये संपादकीय लेख लिहित असत. कल्पतरूमध्ये वृत्त कमी व लेख अधिक असत, तसेच निनावी लेख असत यामध्ये कुंजविहारींचा समावेश असे.

कवीची 'गीता गुरूनाथ ग्रंथमाला' आईवडिलांच्या स्मरणार्थ आहे.

इ.स.१९२६ साली कुंजविहारींचा 'गीतगुंजारव' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला.

वयाने वडीलपण कार्यकर्त्यांच्या नात्याने मैत्रीपूर्ण नाते असणारे कवी कुंजविहारी हे 'गजनफर' वृत्तपत्र काराचे स्फूर्तिदाते होते. गजनफरच्या पहिल्या अंकात ६ डिसेंबर १९२७ रोजी अर्जी ही कविता प्रसिध्द झाली आहे.

तसेच कुंजविहारी 'कर्मयोगी' साप्ताहिकातून लिहत तसेच 'कल्पतरू' साप्ताहिकाचे पुन्हा 'सोलापूर समाचार' दैनिक वृत्तपत्र निघाले यातूनही कवी लिहत असत.

इ.स.१५-८-१९७२ रोजी अप्पासाहेब पवार, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठने यांनी 'आहुती' हा काव्यसंग्रह प्रकाशित केला.

१० नोव्हेंबर १९९६ रोजी कवी कुंजविहारी जन्मशताब्दी निमित्त सोलापूर महानगरपालिकेने 'समग्र कुंजविहारी' हा काव्यसंग्रह प्रकाशित केला. संकलनकार प्रा.डॉ.नीलकंठ पुंडे आहेत.

इ.स.१९६१ साली श्री.रवींद्रनाथ टागोर यांच्या शत सांवत्सरिक जयंती उत्सवाच्या निमित्ताने, ओनामा मंदिराच्या वाङ्.मय प्रयोजन पुस्तक प्रकाशन योजनेचा संकल्प करण्यात आला. या ध्येयधोरणानुसार 'श्री शिवयोगी सिध्देश्वर' हे या प्रकाशन मालेचे पहिले पुस्तक १९६२ साली प्रसिध्द. 'श्री संतकवि शुभराय' हे दुसरे पुस्तक १९६३ साली प्रसिध्द केले. आणि 'श्री कविराय रामजोशी' हे तिसरे पुस्तक, १५ ऑगष्ट १९६४ रोजी प्रसिध्द करण्यात आले.

"पुणे आकाशवाणीवर दर मंगळवारी 'मराठी गडी यशाचा धनी', या नावाने कुंजविहारींच्या काव्यांच्या वाचनाचे सदर सुरू होते."[२४]

**१३) समारोप -**

कवी कुंजविहारी यांच्या कविता सर्वश्रेष्ठ आहेत. कारण जसे साहित्य तसेच त्यांचे राष्ट्रीय कार्य होते. त्यांचे जीवन, साहित्य आणि कार्य यांचा त्रिवेणी संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आहे. याचा अनुभव त्यांचे जीवन व साहित्य अभ्यासल्या नंतर लक्षात येते. म्हणूनच कवीचे स्थान मराठी कविता व राष्ट्रीय कवितेमध्ये स्थान वरचे आहे.



UNIVERSITY ... LIBRARY ... KOLHAPUR

कुंजविहारींच्या कवितांचा अभ्यास चरित्रात्मक अभ्यास पध्दतीने केला आहे. कुंजविहारी काव्यातून सामाजिक, राजकीय, तत्कालीन आदी विषय हाताळले आहेत. त्या काळातले मूलभूत प्रश्न आजही तसेच असल्याचे दिसून येतात. केवळ परिस्थिती आणि काळ बदलला आहे. या टवटवीते कवितेतील सत्व आजही कायम आहे. प्रेरणादायी ठरते. कुंजविहारींच्या कवितेच्या अभ्यासाच्या निमित्ताने ते उलगडून दाखविण्याचा हा प्रयत्न आहे.

कुंजविहारी यांचे पूर्ण नाव हरिहर गुरूनाथ कुलकर्णी उर्फ सलगरकर आहे. त्यांचा जन्म व मृत्यू नोव्हेंबर महिन्यात झाला हा एक योगायोग आहे. त्यांचा कालखंड इ.स.१८९६ ते इ.स.१९७८ आहे. त्यांचे काव्यलेखन शेवटपर्यंत चालू होते. परंतू त्यांच्या काव्याचा कालखंड 'राष्ट्रीय भावनेच्या विस्ताराचा आणि गांधीच्या नेतृत्वाने प्रभावित झालेला कालखंड' इ.स.१९२२ ते इ.स.१९३५ असा घेतला आहे. वयाच्या १२ व्या वर्षापासून कुटुंबाची जबाबदारी त्यांना स्वीकारावी लागली. अनेक प्रतिकूल परिस्थितींना तोंड दिले. मग ती प्रतिकूलता आर्थिक स्थितीची असो, कौटुंबिक पातळीवरची असो नाहीतर साहित्य लेखनामागची किंवा राष्ट्रीय चळवळीतील कार्यातील असो. अशा कठीण परिस्थितीमध्येसुध्दा कवी राष्ट्रांचा सेवक होण्याच्या ध्येय निश्चितीपासून परावृत्त झाले नाहीत. शेवटपर्यंत आपल्या तत्त्वाशी एकनिष्ठ राहिले.

कुंजविहारींच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये त्यांच्या काव्यातूनही दिसून येतात. कुंजविहारी ध्येयवादाने प्रेरीत झाले व त्याचा आविष्कार आपल्या काव्यातही केला आहे. या ध्येयवादी राष्ट्राच्या सेवकाची राष्ट्रभक्ती राष्ट्राशी एकनिष्ठ आहे. त्यांच्या जीवनातल्या साधेपणाची ओढ त्यांच्या काव्यातही दिसते. हा तत्त्वनिष्ठ साधेपणाच त्यांना संकटात निभावून जाण्याची, संकटाला दोन हात करण्याची शक्ती देते. साधेपणा बरोबर कुंजविहारींना अध्यात्माचेही प्रेम होते. ते त्यांच्या सुरूवातीच्या कवितेपासून

शेवटपर्यंतच्या काव्यापर्यंत अनुभवास येते. या सर्व व्यक्तिमत्त्वाचा रेशमी धागा होता तो म्हणजे आशावादी दृष्टीने भवितव्याकडे बघण्याची वृत्ती. तो आशावाद मरणालाही न जुमानणारा आहे. असा उत्तुंग आशावाद 'भेटेन नऊ महिन्यांनी' या सारख्या काव्यातून दिसून येतो.

कुंजविहारींनी लेखनाची सुरूवात 'कल्पतरू' साप्ताहिकातील लेखातून केली व काव्याची सुरूवात इ.स.१९१२ मध्ये केली. 'गीतगुंजारव','आहुती','समग्र कुंजविहारी' या काव्यसंग्रहातून त्यांच्या कविता आहेत. तसेच 'ओनामा प्रकाशन मंदिर' संस्थेतून छोट्या पुस्तिकाही छापल्या.

अशाप्रकारे कुंजविहारींनी सामाजिक वाड्.मयीन, सांस्कृतिक, राष्ट्रीय कार्य केले आहे.

**संदर्भ सूची**


१) संपादक श्री.ज.शा.देशपांडे 'आहुती' डॉ.उषा इथापे (एम.ए.पी.एच.डी.) कुलसचिव शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, प्रस्तावना पृष्ठ-२.

२) तत्रैव पृष्ठ-२.

३) कवी दत्ता हलसगीकर यांची मुलाखत.

४) कु.वसुंधरा हरिहर सलगरकर यांची मुलाखत.

५) श्री.दत्ता हलसगीकर यांची मुलाखत.

६) कु.वसुंधरा हरिहर सलगरकर यांची मुलाखत

७) डॉ.पुंडे निलकंठ, हु.ए.कुर्बान हुसेन, श्रीपाद देशमुख अक्षय प्रकाशन, सरस्वती सदन २५०/ ११ शनिवार पेठ, पुणे-३० पृ.

८) तत्रैव पृष्ठ-१६.

९) कवी दत्ता हलसगीकर यांची मुलाखत.

१०) पुंडे नीलकंठ हु.ए.कुर्बान हुसेन, श्रीपाद देशमुख अक्षय प्रकाशन सरस्वती सदन २५०/११ शनिवार पेठ, पुणे-३० पृ.२४.

११) कवी दत्ता हलसगीकर यांची मुलाखत.

१२) डॉ.पुंडे निलकंठ 'समग्र कुंजविहारी', कवी कुंजविहारी जन्मशताब्दी १९९६ आ.१ ली प्रस्तावना पृष्ठ-६

१३) कवी दत्ता हलसगीकर यांची मुलाखत.

१४) कुंजविहारी 'गीतगुंजारव' कुंजविहारी, गीतगुंजारव मंडळ सोलापूर प्रस्तावना पृष्ठ-५.

१५) तत्रैव प्रस्तावना पृष्ठ-७.

१६) ॲड.वि.गो.काकडे यांची मुलाखत.

१७) 'ओनाना मंदिर शिक्षणसंस्था' इ.स.१९६१ या पुस्तक प्रकाशन योजनेचे दुसरे पुस्तक 'श्री संतकवि शुभराय' १९६३. प्रस्तावना पृष्ठ-१.

१८) कवी दत्ता हलसगीकर यांची मुलाखत.

१९) कुंजविहारी 'गीतगुंजारव' कुंजविहारी, गीतगुंजारव मंडळ सोलापूर पृष्ठ-२.

२०) त्र्य.वि.सरदेशमुख,-'स्मरण' 'अम्बिकातनयदत्तां' चे सुविद्या प्रकाशन, सोलापूर पृष्ठ-२

२१) ॲड.वि.गो.काकडे यांची मुलाखत.

२२) डॉ.पुंडे निलकंठ 'समग्र कुंजविहारी', कवी कुंजविहारी जन्मशताब्दी १९९६ आ.१ ली प्रस्तावना पृष्ठ-७, ८.

२३) कवी दत्ता हलसगीकर यांची मुलाखत.